क्र.२/नसवि/महासभा/ ०४ /२०१४-२०१५
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०८ जानेवारी २०१४

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०४ /२०१४-२०१५

## महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ---------------------------------------------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक १७/०१/२०१५ रोजी दुपारी ०४.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.२०/११/२०१४ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दुःखवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या करनिर्धारक व संकलक विभागाकडे करनिर्धारक व संकलक म्हणून कै.अशोक रामगोंडा पाटील हे कायम सेवेत होते. त्यांचे दि.०५/०१/२०१२ रोजी निधन झाल्याने, त्यांचेवर झालेल्या वैद्यकिय खर्चाची र.रु.१,१४,२४७/- मात्र मिळणेबाबत त्यांची वारस पत्नी श्रीमती सुरेखा अशोक पाटील यांनी मागणी केली आहे. त्यानुसार वैद्यकीय परिपुर्तीची र.रु.१,१४,२४७/- मात्र आदा करणेस मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१२/०९/२०१४ चे विषयपत्र.**

५. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन कुपवाड विभागाचे आस्थापनेवरील कायम कर्मचारी श्री.दत्तात्रय यादव यांना रक्ताचा कर्करोगाची लागण झाल्याने, त्यांचे वैद्यकीय खर्चाची परिपुर्ती र.रु.१,५७,२५३/- मात्र आदा करणेस मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.३०/१२/२०१४ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिकेच्या दवाखाना विभागाकडील कार्यरत असलेला फिरता दवाखाना वाहन कालबाह्य झाले आहे व १० वर्ष किंवा दोन लाख किलोमीटर वापर झालेनंतर अवजड मोटार वाहन निरोपयोगी ठरविणेबाबत शासन निर्णय आहेत. सदरचे वाहन १९८१ साली खरेदी केलेने व कालबाह्य झालेने, फिरता दवाखाना बंद करणे अथवा नविन वाहन खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२०/११/२०१४ चे विषयपत्र.**

७. महानगरपालिकेच्या मिरज शहराच्या रस्त्याच्या कडेला असलेल्या १९० चिंच झाडांच्या फळाचा लिलाव करणेसाठी देकार र.रु.१,१०,०००/- मात्र निश्चित करुन जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्ध करुन जाहिर लिलाव करणेस येणारे प्रसिद्धीचे खर्चास मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (उद्यान विभाग) यांचे दि.०१/१२/२०१४ चे विषयपत्र.**

८. महानगरपालिकेच्या सांगली येथील आमराई उद्यान व सांगली कॉलेज कॉर्नर येथील कवठ व चिंच झाडांच्या फळाचा लिलाव करणेसाठी अनुक्रमे देकार र.रु.१२००/- व र.रु.१३०००/- आणि र.रु.१००००/- मात्र निश्चित करुन तसेच, रि.स.नं.१९/१ या जागेतील गवतांचा देकार र.रु.३५०००/- मात्र निश्चित करुन, जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्ध करुन जाहिर लिलाव करणेस येणारे प्रसिद्धीचे खर्चास मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (उद्यान विभाग) यांचे दि.०१/१२/२०१४ चे विषयपत्र.**

९. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत }

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- ९८

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण महासभा दि.२०/११/२०१४ रोजीचे कार्यवृत्तातील ठराव क्र.७१ ते ठराव क्र.९७ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. महासभा ठराव क्र.९५ दि.२०/११/२०१४ अन्वये महानगरपालिकेच्या सांगली शहरातील काळी खण मत्स्य व्यवसायासाठी दोन वर्षे मुदतीने भाडे पट्ट्याने देणेस मान्यता दिलेली आहे. सदरची काळी खण मत्स्य व्यवसायासाठी दोन वर्षा ऐवजी पाच वर्षे मुदतीने भाडे पट्ट्याने देणेस ही सभा मान्यता देत आहे. अशी दुरुस्ती ही सभा करीत असून, दुरुस्तीसह सदर सभेचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- 

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- 

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** | दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- ९९

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवठा ठराव

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अब्दुल रहिमान अंतुले यांचे नुकतेच वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्‌गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.प्रशांत विजयकुमार पाटील

अनुमोदक :- मा.प्रदिप जगोंडा पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

श्री. प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १००

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक रवि जयनारायण अग्रवाल यांचे बुधवार दि.१४/०१/२०१५ रोजी निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्‌गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

अनुमोदक :- मा.दिलीप तुकाराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

श्री कांचन ऽ कांबळे

महापौर,

श्री. प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १०१

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते श्री.दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी यांचे वडील व जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रदिप भगवान सुर्यवशी यांचे दि.२९/११/२०१४ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. ते केमिस्ट असोशिएशनचे सेक्रेटरी, केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट पत संस्थेचे संस्थापक, क्रिकेट असोशिएशनचे सेक्रेटरी आणि मराठा समाज या संस्थेचे उपाध्यक्ष अशा विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून समाजकार्य केले आहे अशा या समाजकार्यात कार्यरत असणाऱ्या जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्यास ही सभा श्रद्धांजली अर्पण करते. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्‌गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.विष्णू आण्णासाहेब माने

अनुमोदक :- मा.मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
महापौर,

श्री. प्रशासकीय अधिकारी

(सही)
महापालिका सचिव,
सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १०२

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या नगरसेविका सौ.स्नेहा संजय औंधकर यांची सासू मंगल गणपतराव औंधकर यांचे दि.१७/१२/२०१४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्‌गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.शेडजी सुबराव मोहिते

अनुमोदक :- मा.विष्णू आण्णासाहेब माने

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन ड कांबळे
महापौर,

श्री. प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १०३

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

अग्नीबाणाच्या घन इंधनाचे निर्माते हवामानाच्या अचूक अंदाजासाठी गोवारीकर मॉडेलची निर्मिती करणारे, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ.वसंत गोवारीकर यांचे शुक्रवार दि.०२/०१/२०१५ रोजी निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांना ही सभा श्रद्धांजली अर्पण करते. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

अनुमोदक :- मा.दिलीप तुकाराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ कांचन कांबळे
महापौर,

श्री. प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १०४

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

कामगारांसाठीच्या लढ्यासह विविध कामगार चळवळीद्वारे कामगारांना मोबदला आणि न्याय मिळवून देणारे लढवय्या कामगार नेता भाई गुलाब इनामदार यांचे दि.०६/०१/२०१५ रोजी निधन झाले. त्यांना ही सभा श्रद्धांजली अर्पण करते. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.प्रशांत पायगोंडा पाटील

अनुमोदक :- मा.दिलीप तुकाराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

श्री. प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १०५

विषय क्रमांक :- ०२

## दुःखवटा ठराव

सांगली जिल्हातील वडगाव येथील केंद्रीय राखीव दलातील जवान शहीद उमाजी पवार यांना छत्तीसगड येथे आपले कार्य बजावत असताना नक्षल वाद्याकडून करणेत आलेल्या भ्याड हल्ल्यात विरमरण आले त्यामुळे त्यांना ही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करते. त्यांच्या दुःखद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दुःखात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.प्रशांत विजयकुमार पाटील

अनुमोदक :- मा.प्रदिप जगोंडा पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

श्री. प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १०६

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

सांगली येथील रेल्वे स्टेशन समोर राहणारे श्री.गणपती बाळू हेगडे वय वर्षे ८५ यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. श्री.हेगडे यांनी मसाजद्वारे अस्थी उपचार करुन, अनेक गोरगरीबांची सेवा केलेली आहे. तसेच पाळीव जनावरांच्या वर देखील त्यांनी अहोरात्र सेवा करुन उपचार केलेले होते. श्री.हेगडे यांनी काम विनामोबदला समाज सेवा केल्यामुळे त्यांचा अनेक वेळा गौरव झालेला होता. त्यांच्या निधनाने जूने जाणते व्यक्तीमत्व काळाच्या पडद्याआड गेलेले आहेत. ही सभा गणपती बाळू हेगडे यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करते. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

अनुमोदक :- मा.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे

ठराव सर्वानुमते मंजुर

श्री कांचन उ कांबळे

महापौर,

श्री. प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १०७

विषय क्रमांक :- ०२

# दुःखवटा ठराव

मिरज शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री.मुस्तफा अब्दुल करीम उर्फ एम.के.बेपारी यांचे दिर्घ आजाराने दिनांक ०१/१२/२०१४ रोजी निधन झाले. श्री.मुस्तफा अब्दुल करीम उर्फ एम.के.बेपारी यांनी सामाजिक कार्यात उल्लेखनिय स्थान निर्माण केले होते. त्यांच्या दुःखद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दुःखात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.अतहर इद्रिस नायकवडी

अनुमोदक :- मा.सौ.आयेशा इद्रिस नायकवडी

ठराव सर्वानुमते मंजुर

श्री.कांचन उ.कांबळे

महापौर,

~~श्री.प्रशासकिय अधिकारी~~

महापालिका सचिव,

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ | दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १०६

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

दैवज्ञ समाजाचे जुने जाणते कार्यकर्ते तसेच, राष्ट्रसेवा दलात कार्यरत असणारे तत्कालीन सांगली नगरपालिकेने माजी नगरसेवक वामनराव अनंत बेलवलकर यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांना ही सभा विनम्र श्रद्धांजली अर्पण करणे. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.युवराज सतीश बावडेकर

अनुमोदक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ. कांचन ऽ कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४**

दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १०९

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त यशवंतराव बाबूराव माळी यांचे अल्पशः आजाराने दु:खद निधन झाले. त्यांना ही सभा विनम्र श्रद्धांजली अर्पण करते. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्‌गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

अनुमोदक :- मा.संजय नायकू मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन उ.कांबळे

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- ११०

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

भारताचे माजी पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी यांना भारतरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.युवराज सतिश बावडेकर

अनुमोदक :- मा.स्वरदा श्रीरंग केळकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १११

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

दक्षिण भारत जैन सभा बोर्डिंगचे अध्यक्ष पदी श्री.प्रशांत विजयकुमार पाटील (पप्पु मजलेकर) उपमहापौर, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची फेर निवड झाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.प्रशांत विजयकुमार पाटील (पप्पु मजलेकर) यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.सौ.निर्मला राजेंद्र जगदाळे

अनुमोदक :- मा.सौ.धोंडूबाई राजाराम कलगुटगी

ठराव सर्वानुमते मंजुर|

सौ. कांचन ३ कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- ११२

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

मराठी साहित्य समीक्षक प्रा.म.द.हातकणंगलेकर यांना विश्वजागृती मंडळाच्या वतीने सांगली भूषण या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा प्रा.म.द.हातकणंगलेकर यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.प्रशांत पायगोंडा पाटील

अनुमोदक :- मा.दिलीप तुकाराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन उ.कांबळे

महापौर,

श्री. प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- ११३

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

श्री.शशीकांत लक्ष्मण हेर्लेकर हे सांगली नगरीचे सुपूत्र असून, त्यांनी अत्यंत हालाखीच्या परिस्थिती मधून शिक्षण पूर्ण करुन महाराष्ट्र शासनाची एम.पी.एस.सी.ची परिक्षा उत्तीर्ण झालेने, त्यांची बीड येथे मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त म्हणून नेमणुक झाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.शशीकांत लक्ष्मण हेर्लेकर यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.सौ.संगिता विठ्ठल खोत

अनुमोदक :- मा.गौतम संभाजी पवार

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ कांचन उ कांबळे

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- ११४

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

ऑल इंडिया शालेय २३० किलो वजन उचलून वेटलिफ्टींग स्पर्धेमध्ये घनश्याम संजय देसाई यांनी सुवर्णपदक पटकाविले आणि सांगलीच्या शिरपेचात हा एक मानाचा तुरा उंचविल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा घनश्याम संजय देसाई यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.महेंद्र रमाकांत सावंत

अनुमोदक :- मा.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे

ठराव सर्वानुमते मंजुर

डॉ. कांचन उ कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- ११५

विषय क्रमांक :- ०२

---

## अभिनंदनाचा ठराव

२०१५ मध्ये हरियाणा येथे झालेल्या तिसऱ्या ज्युनिअर राष्ट्रीय लगोरी स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाला उपविजेते पद मिळाले. या स्पर्धेमध्ये सहभागी असणारी व सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रसुतिगृहाकडील कर्मचारी श्री.हनुमान कृष्णा साबळे यांची कन्या कु.हतिका हनुमान साबळे हीने महाराष्ट्र संघाचे उपकप्तान पद भूषवून सांगली शहराच्या शिरपेचात हा एक मानाचा तुरा उंचविल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा कु.हतिका हनुमान साबळे आणि संघाचे प्रशिक्षक केदार मेंहेंदळे, सहा.सुवर्णा माळी या सर्वांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

अनुमोदक :- मा.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ कांचन उ. कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिका

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- ११६

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

नुकत्याच नेपाळ येथे संपन्न झालेल्या क्रिडा स्पर्धेमध्ये सांगलीची सुपूत्री कु.विजयालक्ष्मी धनपाल खोत हिने चोक बॉल क्रिडा प्रकारात वैयक्तीक व देशासाठी सुवर्ण पदक पटकावून आपल्या देशाची तसेच सांगलीची शान व मान उंचावली आहे. विजयालक्ष्मी ही आपल्या महापालिकेचे विद्यमान सदस्य श्री.धनपाल खोत व सौ.सुलोचना धनपाल खोत यांची कन्या आहे. तिच्या क्रिडा स्पर्धेतील उज्वल कामगिरीबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा कु.विजयालक्ष्मी धनपाल खोत यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.संतोष शिवदास पाटील

अनुमोदक :- मा.सौ.रोहिणी सत्यजीत पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

(सही)
महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- ११७

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात मिरज येथे गॅस्ट्रोची साथ उद्‌भवली असता, सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा.दिपेंद्रसिंह कुशवाह साहेब यांनी गॅस्ट्रोची साथ आटोक्यात आणण्यासाठी सहकार्य करुन यासाठी विशेष समितीचे गठन करुन, योग्य वस्तुस्थिती नागरीकांसमोर आणली त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा जिल्हाधिकारी मा.दिपेंद्रसिंह कुशवाह साहेब यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

अनुमोदक :- मा.पांडूरंग गंगाराम भिसे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- ११८

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

शिवसेनेचे आमदार मा.अनिल बाबर यांनी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथे उद्भवलेल्या गॅस्ट्रोच्या साथी विषयी विधी मंडळात प्रश्न उपस्थित केला असता, मा.ना.रामदास कदम पर्यावरण मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी त्यावेळी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची बाजू घेवून सदर ठिकाणी जीर्ण झालेली पाईप लाईन बदलणे आवश्यक असलेचे विशद करुन त्यासाठी शासनाकडून भरीव अनुदान देण्याची घोषणा करुन महापालिकेची बाजू मांडली त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.ना.रामदास कदम पर्यावरण मंत्री महाराष्ट्र राज्य आणि शिवसेनेचे आमदार मा.अनिल बाबर यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

अनुमोदक :- मा.दिलीप तुकाराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

(सही)
महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४**

दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- ११९

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समिती सभापती सौ.पुष्पलता बाबासो पाटील यांचे चिरंजीव श्री.मयूर बाबासो पाटील यांना महाराष्ट्र शासनाने नुकताच पत्रकारीतेचा सन्मानरत्न पुरस्कार देवून गौरव केला आहे. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.मयुर बाबासो पाटील यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.सौ.रोहिणी सत्यजीत पाटील

अनुमोदक :- मा.निर्मला राजेंद्र जगदाळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १२०

विषय क्रमांक :- ०३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये नविन टाऊनशिप, अपार्टमेंट जी + ५ या प्रमाणे इमारती उभारणेत येत आहेत अशा इमारतींना बांधकाम परवानगी मागणीसाठी आर्किटेक्ट यांचेकडून नकाशे व आवश्यकती कागदपत्रे सादर करुन बांधकाम परवानगी मागणी केली जाते. अशा बांधकामांना नगररचना विभागाकडून रितसर परवानगी दिली जाते.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुंबई प्रमाणे जी + ५ याप्रमाणे इमारती उभारण्धेत येत आहेत. सदर इमारतीच्या दर्जाबाबतची तरतुद बांधकाम विकास व नियंत्रण नियमावलीमध्ये करण्यात आली असूनही इमारतीची तपासणी नगररचनाकार विभागाकडून केली जात नाही अशा इमारतीचे बांधकाम पूर्णत्वानंतर परिपुर्ती प्रमाणपत्र देतेवेळी मंजूर बांधकाम नकाशाप्रमाणे बांधकाम आहे किंवा नाही. सदरची इमारत बांधताना इमारतीची सामासिक अंतरे, चटई क्षेत्र निर्देशांक यांची तपासणी करुन भागश: परिपुर्ती प्रमाणपत्र दिले जातात अशी वस्तुस्थिती आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या स.नं.१४३७८/ १ ते ६ मधील हॅपीहोम ओसाई डेव्हलपर्स यांनी विकसीत केलेल्या इमारतींची प्रत्यक्ष पाहणी करणेसाठी खालील सदस्यांची त्रिसदस्यीय समिती गठण करणेस ही सभा मान्यता देत आहे.

१. मा.पवार गौतम संभाजी

२. मा.शिकलगार हारुण अजीज

३. मा.सुर्यवंशी दिग्विजय प्रदिप

वरील समितींनी भुकंप प्रतिरोधक,अग्निशामक तथा पुररक्षक नियमावली लागू करण्याबाबत अशा इमारतींची पहाणी करुन, महासभेकडे अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- [signature]

अनुमोदक :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

२५ कान्चन ३ कांबळे

महापौर,

न ऽ १२ २ ~ ५ न । का । २

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १२१

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१२/०९/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कर विभागाकडील आस्थापनेवर अशोक रामगोंडा पाटील हे कर निर्धारक व संकलक या पदावर कायम सेवेत होते. त्यांना मधुमेह, रक्तदाब आणि किडणीच्या आजार असल्याने, वैद्यकीय उपचार घेत असताना त्यांचे दि.१४/१०/२०११ रोजी निधन झाले. त्यांचे वैद्यकीय खर्चासाठी आलेली र.रु.१,२६,९४१/- मात्र रक्कम मिळणेविषयी त्यांची वारस पत्नी श्रीमती सुरेखा अशोक पाटील यांनी दि.०५/०१/२०१२ रोजीचे अर्जान्वये मागणी केली आहे. महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र राज्य (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ मधील तरतुद आणि महाराष्ट्र शासन निर्णय एस.जी./२००५/९/प्र.क्र.आ.१/दि.१९/०५/२००५ नुसार मधुमेह, रक्तदाब, किडणीचे आजारपणावर घेतलेले वैद्यकीय उपचार बील आदा करणेस धोरणात्मक निर्णय झालेला आहे. त्यानुसार कै.अशोक रामगोंडा पाटील यांनी सादर केले प्रमाणे र.रु.१,२६,९४१/- मात्र रक्कमेपैकी ९०% र.रु.१,१४,२४७/- मात्रची रक्कम त्यांची वारस पत्नी श्रीमती सुरेखा अशोक पाटील यांना आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदीमधून होणेचा आहे.

सूचक :- मा.कि.दा.जामदार

अनुमोदक :- मा.विजय घाडगे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासन अधि.(आस्था)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १२२

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.३०/१२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कुपवाड विभागाचे आस्थापनेवर श्री.दत्तात्रय यादव हे कायम सेवत असून, सद्या ते नगरसचिव विभागाकडे कार्यरत आहेत. त्यांना खोकल्याचा त्रास होवू लागल्याने, वैद्यकीय उपचारामध्ये त्यांच्या रक्ताची तपासणी केली असता, त्यांच्या रक्तामध्ये रक्ताचा कर्करोग असलेचे प्राथमिक लक्षणे आढळून आले आहेत. यासाठी त्यांना तातडीने उपचार करणे आवश्यक होते.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कायम सेवकांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम प्रशासकीय ठराव क्र.०७ दि.१० फेब्रुवारी १९९८ अन्वये लागू करणेत आले असून,शासकीय कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र राज्य (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ लागू करणेस मान्यता दिली आहे. तसेच, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील शासन निर्णयानुसार पाच गंभीर आजारामध्ये कर्करोगाचा समावेश करणेत आला आहे.

रक्ताचा कर्करोग हा गंभीर स्वरुपाचा आजार असल्याने श्री.यादव दि.३०/०४/२०१४ ते दि.१२/१०/२०१४ या कालावधी मध्ये केलेल्या वैद्यकीय तपासणी, रक्ताची तपासणी आणि औषोधोपचाराची प्रमाणित केलेली मुळबीले सादर केली असून, यासाठी र.रु.१,७४,७२६/- मात्र खर्च आला असून, शासन निर्णया नुसार ९०% र.रु.१,५७,२५३/- मात्र श्री.यादव आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

श्री.यादव यांना रक्ताचा कर्करोग असलेने, रक्ताची तपासणी, वैद्यकीय तपासणी आणि औषधोपचार दिर्घकाळ घ्यावा लागणार असलेने, प्रस्ताव मंजूरीसाठी वारंवार महासभेकडे सादर करावा लागणार आहे. यासाठी त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या उपचारांची बीले वेळोवेळी आदा करणेस व सदरची बीले प्रमाणीत करणेकामी मा.आरोग्याधिकारी यांना प्राधिकृत करीत असून, सदरची बीले आदा करणेस ही सभा स्थायी मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदीमधून होणेचा आहे.

~~प्रशासन~~ सूचक ~~सचिव(आस्था)~~ :- मा.कि.दा.आमदार

अनुमोदक :- मा.विजय घाडगे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १२३

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१०/११/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

तत्कालीन सांगली नगरपरिषदेने नगरपालिका क्षेत्रात फिरता दवाखाना ही सुविधा सुरु केली होती. सदरची सुविधा देणेसाठी फिरता दवाखाना वाहन क्र.MTK ९५१२ हे वाहन सन १९८१ साली खरेदी करणेत आले आहे. सदर वाहनाचा वापर ३३ वर्षे इतका झाला आहे. महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप/१०९१/प्र.क्र.१२/विनिमय दि.१ आक्टोंबर १९९१ अन्वये कोणतीही अवजड मोटार वाहनासाठी २ लाख किलोमीटर अथवा १० वर्षे वाहनाचा वापर झाल्यानंतर वाहन निरोपयोगी ठरविणेबाबत शासन निर्णय आहेत.

फिरता दवाखान्याकडे सद्या कायमस्वरुपी मेडिकल ऑफिसर उपलब्ध नसल्याने, तसेच, आर.सी.एच.कार्यक्रमांतर्गत महापालिका क्षेत्रामध्ये १० हेल्थ पोस्ट कार्यरत असून, प्रभाग निहाय हेल्थ पोस्टची स्थापना करणेत आलेली आहे. फिरता दवाखान्यामध्ये रुग्ण लाभार्थ्यांची संख्या अत्यल्प असल्याने, दरमहा इंधनावर र.रु.६ ते ७ हजार खर्च होत असून, वेतनापोटी दरमहा र.रु.१ लाख इतका खर्च होत असून, लाभार्थ्यांची संख्या अत्यल्प आहे. त्यामुळे सदरचा फिरता दवाखाना बंद करणे योग्य राहिल. त्याशी ही सभा सहमती दर्शवित असून, तत्कालीन सांगली नगरपरिषदेने चालू केलेली फिरत्या दवाखान्याची सुविधा बंद करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.कि.दा.जामदार

अनुमोदक :- मा.विजय घाडगे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

वैद्यकीय आरोग्याधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १२४

विषय क्रमांक :- ०७

---

सोबतचे उपायुक्त (उद्यान विभाग) यांचे दि.०१/१२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय,मिरज शहरातील रस्त्यांच्या कडेला असलेल्या १९० चिंच झाडांच्या चिंच फळांचा सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जाहिर लिलाव काढणेसाठी र.रु.१,१०,०००/- मात्र देकार रक्कम निश्चित करुन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील मालमत्ता विनियोग कलम ७९(क) अन्वये जाहिर लिलाव करणेसाठी जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्ध करुन, जाहिर लिलाव करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. कि. दा. जामदार

अनुमोदक :- मा. विजय घाडगे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

उद्यान अधीक्षक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १२५

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (उद्यान विभाग) यांचे दि.०१/१२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सांगली शहरातील आमराई उद्यानातील तीन कवठ झाडांच्या कवठ फळांचा, चिंच झाडांच्या चिंच फळांचा आणि आमराई ते कॉलेज कॉर्नर येथील बारा आणि वॉटर वर्क्स येथील दोन अशा एकूण चौदा झाडांचा तसेच, रि.स.नं.९९/१ उगविलेल्या गवतांचा जाहिर लिलाव करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील मालमत्ता विनियोग कलम ७९(क) अन्वये जाहिर लिलाव करणेस खालील प्रमाणे देकार रक्कम निश्चित करुन, जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्ध करुन, जाहिर लिलाव करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | लिलाव तपशिल | २०१४.१५ चे लिलाव देकार। र.रु. |
|---|---|---|
| १. | आमराईतील कवठ झाडांची कवठ फळे | १२००/- |
| २. | आमराईतील चिंच झाडांची चिंच फळे | १३०००/- |
| ३. | आमराई ते कॉलेज कॉर्नर रस्त्यावरील चिंच झाडांची चिंच फळे | १००००/- |
| ४. | रि.स.नं.९९/१ सांगली येथील २०५ क्षेत्रात नैसर्गिकरित्या उगविलेले गवत | ३५००० |

सूचक :- मा.किदा.नामदार

अनुमोदक :- मा.विजय घाडगे

उद्यान अधिक्षक

ठराव सर्वानुमते मंजुर

कांचन कांबळे
महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** | दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १२६

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

श्री.इद्रिस इलियास नायकवडी माजी महापौर सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी त्यांचे मुलीचा दि.०१ मार्च २०१५ रोजी विवाह समारंभ असल्याने, महानगरपालिकेच्या मिरज हायस्कूलचे ग्राऊंड मिळणेस तसेच, सदर ग्राऊंड मध्ये असणारी दक्षिण बाजूची २० फुटी भिंत पाडून ती पुन्हा आहे त्या स्थितीत बांधून देणेच्या अटीवर दि.१७/०१/२०१५ रोजीच्या अर्जाने मागणी केली आहे. सदरचा अर्ज यालगत केला असून, त्याशी ही सभा सहमती दर्शवित आहे. श्री.नायकवडी यांनी मागणी केलेनुसार त्यांचे मुलीचा दि.०१ मार्च २०१५ रोजी विवाह समारंभासाठी महानगरपालिकेच्या मिरज हायस्कूलचे ग्राऊंड निमयमानुसार भाड्याने देणेस तसेच, विवाह समारंभानंतर सदर ग्राऊंड मध्ये असणारी दक्षिण बाजूची २० फुटी भिंत पुन्हा बांधून देणेच्या अटीवर ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature]

अनुमोदक :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

श्री.कांचन उ. कांबळे
महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

[signature]
महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १२७

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२३/१२/२०१४ चे विषयपत्र सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला. प्रस्तुतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांची अंदाजपत्रके तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग,पुणे यांचेकडील दरसूची वापरली जाते. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २०१४-१५ ची दरसूची तयार केली असून, सदरची दरसूची वापरणेस दि.०१/०७/२०१४ रोजी मान्यता दिली आहे. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांची अंदाजपत्रके तयार करणेसाठी सदरची दरसूची वापरणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, डांबरीकरणाचे कामासाठी वापरणेत येणाऱ्या डांबराच्या दरामुळे गेली तीन ते चार वर्षे १५ दिवसांनी बदल होत आहे. त्यानुसार भारत पेट्रोलियम कंपनी यांचेकडून प्राप्त होणाऱ्या डांबराच्या बेसीक दराप्रमाणे अंदाजपत्रके तयार करणेस तसेच शासनाची सार्व.बांधकाम विभागाकडील दरसूची व्यतिरिक्त दरसूचीमध्ये समाविष्ठ नसणाऱ्या ॲटम ही विकास कामाची अंदाजपत्रके तयार करताना वापरावी लागतात. सबब, महाराष्ट्र शासनाच्या दरसूची मध्ये समाविष्ठ नसणारे ॲटम ही अंदाजपत्रके तयार करताना वापरणेस आणि सद्या बाजारात सिमेंट,सळी इत्यादी बाबींच्या बेसिक दरामध्ये वारंवार बदल होत असल्याने, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक विभागाकडून पारीत होणारे आदेश व परिपत्रके वापरणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.कि.चा. जामदार

शहर अभियंता

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. विजय घाडगे

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १२८

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२३/१२/२०१४ चे विषयपत्र सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला. प्रस्तुतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेचे विभागीय कार्यालय, मिरज येथील अमननगर आणि दर्गा मोहल्ला मुस्लीम जमात मिरज शरीफ या संस्थेने महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मिरज मालगाव रस्त्यावरील अमननगर वसाहतीस कब्रस्तानची सोय नसलेने, कब्रस्तानची सोय करणेची मागणी केली आहे. सदर ठिकाणी कब्रस्तानची सोय नसलेने लोकांना मिरजेतील कब्रस्तानमध्ये दफन विधीकरीता जावे लागते. अमननगर वसाहती नजीक दत्त कॉलनी,एकता कॉलनी,खोतनगर,कलावती वसाहत,गुलमोहर कॉलनी, दर्गा मोहल्ला,सातपुते कॉलनी,इंदिरा नगर,पटवर्धन वसाहत,शफा कॉलनी,नुराणी वसाहत, बरगाले नगर इत्यादी कॉलन्या असून, सदर विस्तारीत भागांसाठी मुस्लीम समाजाची कब्रस्तान असणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या पडीक असलेल्या गट क्रमांक ९८ मधील १.१७ हेक्टर आर चौ.मी. खुली जागा विकसीत केलेस, परिसरातील मुस्लीम समाजाची कब्रस्तानची सोय होणार आहे. त्याशी ही सभा सहमती दर्शवित असून, महापालिकेच्या मालकीची स.नं.९८ मधील एकूण क्षेत्र १.१७ हेक्टर आर पैकी ओढा व बफरझोन खालील क्षेत्र सोडून शेती विभागात समाविष्ट असलेली १८०० चौ.मी.क्षेत्राची जागा अमननगर वसाहतीसाठी कब्रस्तान करीता देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक : [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर,

अनुमोदक :- [signature]

[handwritten line]

[signature]
महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १२९

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे सहा.संचालक नगररचना यांचे दि.१६/०१/२०१५ चे विषयपत्र सभेमध्ये वाचून दाखविण्यात आले. प्रस्तुतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

तत्कालीन सांगली शहराची सुधारीत विकास योजना शासन अधिसूचना नगरविकास विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.टी.पी.एस./२०७६/८०/युडी-५ दि.२८/०३/१९७७ साली मंजूर झालेली आहे. सदरची योजना दि.०१/०६/१९७७ पासून अंमलात आलेली आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रारुप विकास आराखडा शासनाकडे अधिसूचना क्र.टी.पी.एस./२००८/२४४/सी.आर.१८१४/०९/इ.पी./पब्लीश/युडी-१३ दि.०४/०४/२०१२ अन्वये भागशः मंजूर झालेली आहे. भागशः मंजूर अहवालानुसार सांगली येथील स.नं.१५६/१ ते ५ व १५४/२ब/१ या जमिनीमधून कलम २६(१) व ३०(१) अन्वये दक्षिणोत्तर २४.४० मी.(८० फुटी) व १५.२५ मी.(५० फुटी) रस्ते प्रस्तावित करण्यात आलेले आहेत.

स.नं.१५६/१ ते ५ व १५४/२ ब या जमिनीचे एकूण क्षेत्र ६३१०० चौ.मी. इतके असून, जागेचे मुळ मालक श्री.शिवराम बाबा पाटील व इतर ४ असे असून, त्यांचे वतीने वटमुखत्यारधारक श्री.हणमंतराव बंडूजी पवार यांनी दि.१२/०३/२०१४ रोजी अर्ज देवून रस्त्याने बाधीत झालेल्या क्षेत्राची नुकसान भरपाई बाबत मागणी केली आहे. रेखांकनातील अंतर्गत रस्ते मंजूर विकास योजनेतील नियोजीत ८० फुटी व ५० फुटी रस्त्याखालील क्षेत्राची कब्जेपट्टी अर्जदार यांनी विकास योजनेतील रस्त्याखालील क्षेत्राचा मोबदला मिळणेचा हक्क राखून ठेवन रेखांकनास मंजूरी वेळी कब्जेपट्टी दिलेली आहे.

सदर जमिनीमधून ८० फुटी रस्त्याखालील क्षेत्र ३४८० चौ.मी.व ५० फुटी रस्त्याखालील क्षेत्र २०४८.५० चौ.मी.क्षेत्र इतके बाधीत होत असून, मा.संचालक, नगररचना महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील परिपत्रक क्र.मुल्यांकन/नागरी विभाग/३२/सी/टीपीई २९३६ दि.२१/०४/१९९९ मधील दि.२१/०४/१९९९ मधील मार्गदर्शक तत्वानुसार विकास योजनेतील रस्त्याने बाधीत होणाऱ्या संपूर्ण क्षेत्राचा मोबदला जमिन मालकास देणे उचित होणार नाही. अभिन्यासात दर्शविलेल्या विकास योजनेच्या रस्त्याच्या भूसंपादन प्रकरणात विकास कर्तास अभिन्यासाच्या दृष्टीने नियमानुसार आवश्यक रस्ता रुंदीपेक्षा जास्त रुंदीचा रस्ता विकास योजनेमध्ये प्रस्तावित केला असल्यास अशा अतिरिक्त क्षेत्रासाठीच जमिनीचा मोबदला जमिन मालकास अनुज्ञेय होईल अशी तरतुद परिपत्रकामध्ये नमुद केलेली आहे.

... २ ...

स.नं.१५६/१ ते ५ आणि १५४/२ब या जमिनीमधून रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्र ५५२८.५० चौ.मी. इतके असून, मा.संचालक, नगररचना महाराष्ट्र पूणे यांचेकडील परिपत्रकानुसार मंजूर रेखांकनासाठी आवश्यक ९ मी. व १२ मी. रस्त्याचे क्षेत्र वजा जाता नुकसान भरपाई क्षेत्र २१५७ चौ.मी.इतके योग्य असून, तेवढ्या क्षेत्राचा मोबदला जमिन मालकास देणे योग्य होणार आहे. सन २०१४ चे शिघ्रसिद्ध गणकानुसार सदर जमिनीचे मुल्यांकन २०१३० प्रति चौ.मी.यासाठी एकूण र.रु.४२,४१,४६९/- इतकी रक्कम आदा करावी लागणार आहे. सदर रक्कमेतून ५०% र.रु.२१,२०,७३४/- मात्र इतकी प्रथम टप्प्यात आदा करावी लागणार असून, नियमानुसार होणारी व टी.डी.एस.कपात करुन घेवून उर्वरित रक्कम मा.सहा.संचालक नगररचना,सांगली यांचेकडून अंतिम मुल्यांकन करुन घेवून आदा करणे योग्य होणार आहे.

केंद्र शासनाच्या भूमिसंपादन, पुर्नवसन,पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळणेचा व पारदर्शकतेचा अधिनियम २०१३ हा दि.०१/०१/२०१४ पासून अंमलात आला आहे. भूसंपादन प्रकरणात मुल्यांकन करताना यापुर्वी र.रु.३०% ऐवजी नविन कायद्यानुसार १००% रक्कम दिलासा रक्कम आदा खाजगी वाटाघाटीने करता येईल अशी तरतुद करणेत आलेली आहे.त्याशी ही सभा सहमती दर्शवित असून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेतली असता, स.नं.१५६/१ ते ५ व १५४/२ब या जमिनी मधून मंजूर विकास योजनेतील ८० फुटी व ५० फुटी रस्त्याने बाधीत होणाऱ्या रस्त्याची २१५७ चौ.मी. जागेची नुकसान भरपाई सन २०१४ चे शिघ्रसिद्ध गणकानुसार मुल्यांकन र.रु.४२,४१,४६९/- मात्र व केंद्र शासनाला पुर्नवसन व पुर्नस्थापना वाजवी नुकसान भरपाई व पारदर्शकता कायदा २०१३ व अंमलबजावणी नुसार दि.०१/०१/२०१४ नुकसान भरपाई १००% दिलासा रक्कम वटमुखत्यारधारक यांना आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. तसेच, जागा मालक अथवा वटमुखत्यारधारकांने टी.डी.आर.ची मागणी केलेस मागणीनुसार टी.डी.आर.देणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च सन २०१४-१५ चे आर्थिक वर्षामधील ०५१) ३-इतर योजना १) भांडवली खर्च - ब ४१३०४ विकास निधी मधून होणारा खर्च मनपा या लेखाशिर्षामधून होणेचा आहे.

नगररचना का १

सूचक :- [signature] मा. कि. टा. जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

अनुमोदक :- [signature] मा. संजय मेंढे

[signature] कांचन कांबळे
महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- 130

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे सहा.संचालक नगररचना यांचे दि.१६/०१/२०१५ चे विषयपत्र सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला. प्रस्तुतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड येथील स.नं.१८४ या जागेचे अंतिम रेखांकन मंजूर झालेले आहे. सदर जागेचे मुळमालक श्री.सखाराम ग.महाडीक व एन.एच.पवार वटमुखत्यारधारक म्हणून साईनाथ रेसिडेन्सी पत्रकार नगर, सांगली यांनी सदर रेखांकनातून ३० मी. व १८ मी. रस्त्याने बाधीत होणाऱ्या क्षेत्राचा ताबा नुकसान भरपाई मिळणेच्या अटीवर दिला असून, ७/१२ उताऱ्यानुसार १७७२३.९०चौ.मी. क्षेत्रावर महापालिकेचे नाव नोंद झालेले आहे. वटमुखत्यारधारक यांनी सदर बाधीत जागेची नुकसान भरपाई मिळणेची मागणी केली आहे.

मंजूर रेखांकनानुसार ३० मी.रुंद रस्त्याची लांबी ५४९ मी. इतकी होत असून, विकास नियंत्रण नियमावलीनुसार या रस्त्याची लांबी १५ मी.आवश्यक आहे. सदर रेखांकनात ३० मी.रुंदीचा रस्ता दर्शविला असलेने, उर्वरित १५ मी.रुंदीने ८२३५ चौ.मी. क्षेत्राची नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे. तसेच, १८ मी.रस्त्याची लांबी ४७.५० मी. इतकी असून, विकास नियंत्रण नियमावलीनुसार सदर रस्त्याची लांबी ६ मी. आवश्यक आहे. सदर रेखांकनात १८ मी. रुंदीचा दर्शविला असल्याने, उर्वरित १२ मी.रुंदीने ५७० चौ.मी.क्षेत्राकरीता नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे. महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीनुसार रेखांकन मंजूर करताना रस्त्याच्या लांबीच्या प्रमाणात नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर जागेमधून ३० मी. व १८ मी.रस्त्याने एकूण ८८०५ चौ.मी.क्षेत्र बाधीत होत आहे. सन २०१५ चे शिघ्रसिद्ध गणकानुसार खुल्या जमिनीचा दर रु.२२००/- चौ.मि. (प्रति) इतका आहे. त्यानुसार सदर जागेची किंमत र.रु.१,३९,३२,६००/- इतकी होत आहे.

केंद्र शासनाच्या भूमीसंपादन,पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा अधिनियम २०१३ हा नविन कायदा ०१/०१/२०१४ पासून अंमलात आलेला आहे. भूसंपादन प्रकरणात मुल्यांकन करताना दिलासा रक्कम यापूर्वीचे कायद्यानुसार ३०% ऐवजी १००% करण्यात आलेली आहे. त्यानुसार १००% दिलासा रक्कम खाजगी वाटाघाटीने जमिन संपादन करता येईल. सबब, महानगरपालिकेच्या स.नं.१८४ मधील ३० मी. व १८ मी. रस्त्याने बाधीत होणारे एकूण क्षेत्र ८८०५ चौ.मी.ही जागा संपादन करणेस व त्याकामी येणारे र.रु.१,३९,३२,६००/- मात्रची केंद्र शासनाच्या पुर्नवसन व पुर्नस्थापना वाजवी नुकसान भरपाई व पारदर्शकता कायदा २०१३ व अंमलबजावणी नुसार दि.०१/०१/२०१४ नुकसान भरपाई १००% दिलासा रक्कम वटमुखत्यारधारक यांना आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. तसेच, जागा मालक अथवा वटमुखत्यारधारकांने टी.डी.आर.ची मागणी केलेस मागणीनुसार टी.डी.आर.देणेस ही सभा मान्यता देत आहे.

नगर२स्थना।क्र।३ उक्त कामी येणारा खर्च सन २०१४-१५ चे आर्थिक वर्षामधील ०५१) ३-इतर योजना ९) भांडवली खर्च - ब ४१३०४ विकास निधी मधून होणारा खर्च मनपा या लेखाशिर्षामधून होणेचा आहे.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सूचक :- मा. कि.दा.जामदार

अनुमोदक :- मा. संजय मेंढे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १३१

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (सहा.संचालक नगररचना) यांचे दि.१६/०१/२०१५ चे विषयपत्र सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला. प्रस्तुतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीमधील कुपवाड वानलेसवाडी भुयारी गटार योजना राबविणेकरीता कुपवाड व वानलेसवाडी परिसरामध्ये ऑक्सीडेशन पॉन्ड (मलशुद्धीकरण केंद्रासाठी) कुपवाड वानलेसवाडी या भागामध्ये जागा आरक्षीत नाही. सदर प्रकल्प राबविणेकरीता उपांगे (मलशुद्धीकरण) केंद्रासाठी अंदाजे ५ एकर जागा आवश्यक आहे. यासाठी कार्यकारी अभियंता, जलनि:सारण विभाग,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी जुना हरिपूर रस्त्यालगत मिरज स.नं.८६३ ते ८६७ या जमिनीमधील ५ एकर जागा तांत्रिकदृष्ट्या योग्य असलेचे नमुद केले आहे. सदरची जागा खाजगी वाटाघाटीने संपादन करणेबाबत मा.आयुक्तसो यांचे दालनात चर्चाही झाली. सदरची जागा ताब्यात घेणेबाबत महासभेकडे प्रस्ताव सादर करणेबाबत आदेशीत करणेत आले. त्यानुसार प्रस्तुतचा प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कलम २६ अन्वये प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेनुसार मिरज स.नं.८६३,८६४,८६७,८६८ व ८६९ पैकी जागेवर आ.क्र.३५६ स्पेशल पब्लीक सेमी पब्लीक (फॉर हेल्थ,एज्युकशेन फॅसिलीटीज) असे आरक्षण प्रस्तावित होते.विकास योजना अहवालानुसार या आरक्षणाचे क्षेत्र १,९१,३४८.०० चौ.मि.असून, या आरक्षणाचे समुचित प्राधिकरण खाजगी असे नमुद आहे. कलम ३० अन्वये विकास योजना मंजूरीसाठी शासनास सादर करताना उक्त जागेपैकी काही क्षेत्रावर आरक्षण क्र.३६३ ईएसआर व उर्वरित संपूर्ण आरक्षण वगळून सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट करुन विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात आलेली होती. शासनाने कलम ३१ (१) अन्वये दि.०४/०४/२०१२ रोजी विकास योजना भागश: मंजूर करताना ईपीपी -५७, पीसीएम -१-३५६ नुसार २.०० हेक्टर क्षेत्रावर आरक्षण क्र.३५६ गार्डन / प्ले ग्राऊंड असे आरक्षण प्रस्तावित करुन उर्वरित जागा रहिवास विभागात समाविष्ट करणेचा निर्णय घेवून विकास योजना पुर्नप्रसिद्ध करणेबाबत निर्णय घेतला आहे. तथापि याबाबत सूचना व हरकती नंतर अंतिम निर्णय शासन स्तरावर होणार आहे. ईपी नुसार प्रस्तावित केलेले आरक्षण क्र.३५६ गार्डन /प्ले ग्राऊंड चे स्थान ईपीबाबतचा नकाशा प्राप्त झाला नसलेने समजून येत नाही. तथापि, रहिवास वापर विभागात प्रस्तावित असलेले क्षेत्र मैलाशुद्धीकरण केंद्रासाठी प्रस्तावित करता येईल. या जागेचे सर्व हिस्से दर्शविणारा मोजणी नकाशे, ईपीबाबतचा नकाशा प्राप्त झालेनंतर कोणत्या सर्व्हे नंबरपैकी किती जागा आवश्यक आहे याबाबत खात्री करता येईल.

... २ ...

सदर जमिनधारकांने नुकसान भरपाई रोख रक्कम मागणी केलेस त्यांना सन २०१५ चे शिघ्रसिद्ध गणकानुसार नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे. सन २०१५ चे मुल्यदर तक्त्यानुसार मिरज स.नं.८६१ ते ८७२ करीता जमिनदार रु.११५०/- प्र.चौ.मी.असा नमुद आहे. मैला शुद्धीकरण केंद्रासाठी ५ एकर म्हणजेच २०,०००.०० चौ.मी.क्षेत्र आवश्यक आहे. प्रत्यक्ष मोजणी नकाशानुसार सर्व्हे नंबर निहाय मुल्यांकन करुन नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे. तथापि, सद्यस्थितीत एकत्रित २०,०००.०० चौ.मी.क्षेत्र स्थुल असलेने सन २०१५ चे मुल्यदर तक्तेमधील अंमलबजावणी सूचना क्र.१६ ब नुसार मुल्यांकन करणे आवश्यक आहे. त्यानुसार र.रु.१,७५,९५,०००/- इतके मुल्यांकन होत आहे.

केंद्र शासनाचा भूमीसंपादन,पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा अधिनियम २०१३ हा नविन कायदा दि.०१/०१/२०१४ पासून अंमलात आलेला आहे. भूसंपादन प्रकरणात मुल्यांकन करताना दिलासा रक्कम यापूर्वीचे कायद्यातील ३०% ऐवजी नविन कायद्यात १००% करण्यात आलेली आहे. त्यामुळे नविन कायद्यानुसार मुल्यांकन नुसार १००% दिलासा रक्कम खाजगी वाटाघाटीने जुन्या हरिपूर रस्त्यालगत मिरज स.नं.८६३ ते ८६७ ही जमिन संपादित करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १३२

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सांगली सि.स.नं.७४६/१ येथील सिंधी मार्केट महानगरपालिका मालकीचे आहे. सदरचे दुकान गाळे महासभा ठराव क्र.५४ दि.०१/०४/२००३ पासून ९ वर्षे मुदतीने भाडे कराराने देणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार गाळे धारकाकडून पूर्वीचे सरासरी भाडे र.रु.१०१०/- याप्रमाणे रितसर भाडेपट्टा करार करुन घेणेत आलेला आहे.

महासभा ठरावानुसार गाळा क्र.१ व २ क्षेत्रफळ कमी असल्याने आणि उर्वरित गाळा क्र.३ ते ५१ या गाळे धारकांना पूर्वीच्या सरासरी भाडेवर तीनपट म्हणजे रु.३३००/- याप्रमाणे भाडेवाढ सूचविली आहे. तथापि, महासभेने गाळेधारकांच्या विनंतीवरुन तसेच, पूर्वीच्या भाड्याच्या दुप्पटीने भाडे आकारणी करावी अशी विनंती केलेनुसार महासभा ठराव क्र.९३ दि.१६/०८/२००७ अन्वये सरासरी र.रु.२५००/- मात्र याप्रमाणे वार्षिक भाडेवाढ आकारणी करणेस मान्यता दिली आहे. त्यानुसार भाडे आकारणी सूरु असून, सदर गाळेधारकांची मुदत दि.३१/०३/२०१२ रोजी संपलेली आहे.

महासभा ठराव क्र.१४ दि.१८/१२/२००८ अन्वये महानगरपालिकेने दिलेल्या दुकान गाळ्यांना दर तीन वर्षानी २०% भाडेवाढ करणेबाबत धोरण निश्चित केले असून, त्यानुसार सदर दुकान गाळेधारकांनी २९ वर्षे कराराने दुकान गाळे मिळणेसाठी दि.०४/०७/२०१४ रोजी अर्ज देवून मागणी केली आहे. सदर दुकान गाळेधारकांना मुदतवाढ दिल्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.

सिंधी मार्केट मध्ये दुकान गाळेधारकांच्या मागणीनुसार मा.सहा.संचालक नगररचना यांनी ठरवून दिलेल्या सन २०१४ चे बाजारमुल्यानुसार सदर गाळ्यांचा दि.०१/०४/२०१४ पासून खालील प्रमाणे सुधारीत वार्षिक भाडे आकारणेस व प्रत्येक तीन वर्षाने २०% भाडेवाढ आकारणे उचित होणार आहे. सदर दुकान गाळ्यांचे बांधकाम सन २००२ असल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते. सदर गाळे १० वर्षे जूने असल्याने घसारा मुल्य ८०% विचारात घेवून, बँकेच्या सर्वसाधारण ठेवीचा व्याजदर १०% विचारात घेवून वाणिज्य मिळकतीच्या वार्षिक १०% परतावा भाडे स्वरुपात मिळाणे अपेक्षित आहे. त्यानुसार सन २०१४-१५ अखेर थकबाकी व सेवाकर भरुन घेवून सदरचे दुकान गाळे २९ वर्षे मुदतीने मुदतवाढ देणेस अभिप्राय दिलेला आहे. त्याशी ही सभा सहमती दर्शवित आहे.

... २ ...

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेतली असता, सदर दुकान गाळ्यांचे १० वर्षापूर्वी नुतनीकरण करणेत आलेले आहे. नविन दराने घरपट्टी आणि इतर टॅक्सेस मध्ये वाढ झाल्याने, तसेच सद्या व्यापारामध्ये निर्माण झालेल्या स्पर्धेमुळे उत्पन्न अत्यल्प प्रमाणात मिळत आहे.

मा.सहा.सचांलक नगररचना यांनी सुचविलेली मासिक भाडेवाढ सदरच्या व्यापाऱ्यांना परवडणारे नसून, भाडेवाढ ४०% भाडेवाढ कमी करणेबाबत सिंधी मार्केट येथील दुकान गाळेधारकांनी समक्षात भेट घेवून भाडे कमी करणेबाबत विनंती केली. सदर गाळेधारकांनी केलेली विनंती मान्य करावी असे या सभेचे स्पष्ट मत आहे. तसेच महानगरपालिकेच्या मालकीच्या सि.स.नं.७४६/१ मधील सिंधी मार्केट दुकान गाळे क्र. १ ते ५१ या गाळेधारकांना सरसकट वार्षिक भाडे र.रु.५०००/- याप्रमाणे भाडेवाढ करणेस ही सभा मान्यता देत असून, दर तीन वर्षानी २०% भाडेवाढ करुन तसेच, सन २०१४-१५ अखेरची थकबाकी व सेवाकर भरुन घेवून दि.०१/०४/२०१२ पासून २९ वर्षे कराराने मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे. प्रस्तुत कामी प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशीत करीत आहे.

सूचक :- 

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.जगन्नाथ ठोकळे.

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १३३

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.शेवंताताई गोपाळ वाघमारे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील मयत झालेल्या डेडबॉडीच्या अंत्यविधीसाठी महापालिका जे साहित्य देते ते अपुरे असते. तिरडीसाठी फक्त दोन काठ्या महापालिका पुरविते. त्यानंतर तिरडी बांधताना आडवे बांधणेच्या चिवट्या नातेवाईकांना विकत घ्याव्या लागतात व त्यावरील कडबा लवकर उपलब्ध होत नाही. तसेच, रात्री अपरात्री अवेळी थंडी पावसाळ्यामध्ये नातेवाईकांना व शेजाऱ्यांना त्याचा खूप त्रास होतो. तरी इतर साहित्या ऐवजी स्टील अथवा लोखंडी तिरडी (स्ट्रेचर) करुन महापालिकेकडे उपलब्ध करुन दिलेस एकदाच खर्च होवून बाकीचा बांबू चिवट्यांचा कायम स्वरुपी खर्च वाचणार आहे. तसेच, लोकांची गैरसोय होणार नाही. तरी महापालिकेकडे अंत्यविधीसाठी स्टील अथवा लोखंडी स्ट्रेचर उपलब्ध करुन देणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेसाठी सविस्तर अहवाल मान्यतेसाठी सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

आरोग्याधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १३४

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.संगिता विठ्ठलराव खोत यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील समतानगर परिसरातील वॉर्ड क्र.२५ मध्ये रस्ता क्र.१०-११ येथे चौक आहे. त्या चौकास हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे नामकरण करणेकामी सविस्तर अहवाल मान्यतेसाठी सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १३५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१४ मधील विनायकनगर येथील रस्त्यांचे विनायकनगर गल्ली क्र.१ ते ६ गल्लींना नामकरण करणेकामी सविस्तर अहवाल मान्यतेसाठी सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- १७/०१/२०१५

ठराव क्रमांक :- १३६

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.युवराज शिवाजीराव गायकवाड यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.२ चे क्षेत्रफळ व लोकसंख्या त्यांचा विचार केला असता तेथील कचरा गोळा करीत असलेल्या कंटेनरची संख्या १०५ असून दररोज उचलला जात असलेला ४० ते ४५ कंटेनर, कचरा १८० टनापेक्षा ही जादा आहे. तसेच हा कचरा गोळा करुन व कॉम्पॅक्टर भरुन डेपोवर पाठविला जातो. सद्या प्रभाग दोन मध्ये दोन कॉम्पॅक्टर असून, सुद्धा रोजच्या रोज कचरा उचलला जात नाही. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्‌भवत आहे. सदरच्या प्रभागात आणखी एका कॉम्पॅक्टरची गरज भासत आहे. तरी नागरीकांच्या आरोग्याचा विचार करुन त्वरीत नविन कॉम्पॅक्टर खरेदी करणे आवश्यक असल्याने, नविन कॉम्पॅक्टर खरेदी करणेकामी सविस्तर अहवाल मान्यतेसाठी सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- [signature]

अनुमोदक :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर,

आरोग्याधिकारी

[signature]
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका